॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

*** सुविचार ***
सर्वात मोठे पाप म्हणजे
अन्यायाशी तडजोड.

आता राहा प्रत्येक क्षणाला अपडेट
'वीरभूमी'च्या बातम्या आपल्या बोटावर
आपल्याला वीरभूमीच्या सर्व बातम्या व ई-पेपर सहज वाचता यावा यासाठी आम्ही आपल्यासाठी घेऊन आलो आहोत veerbhumi ॲप
आता आपल्यासाठीच veerbhumi ॲप
आता बातमीबरोबरच बरेच काही
मोबाईलमधील Google Play वर जा आणि सर्च करा veerbhumi

अहिल्यानगर | बुधवार, दि. १६ एप्रिल २०२५ | वर्ष ६ वे | अंक ७ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145 | www.veerbhuminews.com



विरभद्र पतसंस्था संचालक मंडळाची निवड बिनविरोध

पान क्र. २ वर



संत श्री शेख महंमद महाराजांच्या मंदिराचा जिर्णोद्धार व्हावा ही सर्व धर्मियांची इच्छा

पान क्र. ३ वर



करंजी घाटात पेट्रोलचा टँकर पलटी; दुर्घटना टळली

पान क्र. ४ वर

# नगराध्यक्षांना हटविण्याचे अधिकार नगरसेवकांनाच

## शासनाकडे प्रस्ताव पाठवण्याची गरज नाही । अध्यादेश काढून लगेच अंमलबजावणी राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

● **मुंबई । वीरभूमी –**
राज्यातील नगर परिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरींच्या नगराध्यक्षांना पदावरून हटविण्याचे अधिकार आता नगरसेवकांना देण्याचा निर्णय मंगळवार दि. १५ एप्रिल रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

राज्यात सध्या कार्यरत असलेल्या १०५ नगर परिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरींसाठी हा निर्णय लागू असणार आहे. अध्यादेश काढून या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्यात येणार आहे. अधिनियमातील सुधारणाविषयक विधेयक राज्य विधिमंडळाच्या आगामी पावसाळी अधिवेशनात मांडण्यात येईल. सरकारच्या या निर्णयामुळे अनेक वर्षे रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक दिवाळीनंतर होण्याचे संकेत मिळत आहेत.

राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. या सुधारणेनुसार नगराध्यक्षांना पदावरून दूर अधिकार निवडून आलेल्या नगरसेवकांना असणार आहेत. निवडून आलेल्या नगरसेवकांच्या संख्येपैकी दोन तृतीयांश संख्येने नगरसेवकांच्या सह्यांचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना पाठवता येईल. या प्रस्तावावर जिल्हाधिकाऱ्यांना १० दिवसांच्या आता विशेष सभा आयोजित करून मतदानाद्वारे निर्णय घ्यावा लागेल.



यापुर्वी नगराध्यक्षांना पदावरुन दूर करण्यासाठी निवडून आलेल्या सदस्यापैकी पन्नास टक्के सदस्यांच्या सह्यांचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवला जात असे. त्यानंतर शासनस्तरावर अध्यक्षांना पदावरून दूर करण्याची कारवाई केली जात असे. त्याऐवजी आता अध्यक्षांना पदावरून हटवण्यासाठी निवडून आलेल्या सदस्यांना अधिकार दिले जाणार आहेत. सध्या अस्तित्वात असलेल्या १०५ नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरीच्या लोकनियुक्त नगरसेवकांना हे अधिकार लगेच मिळणार आहेत.

राज्य सरकारने नगराध्यक्षांना पदावरून हटविण्याबाबतच्या अधिनियमात सुधारणा केल्याने अनेक वर्ष रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका यंदाच्या वर्षी दिवाळीनंतर होण्याचे संकेत मिळत आहेत. सर्व प्रमुख राजकीय पक्षांनी स्थानिक निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मोर्चेबांधणी सुरु केली आहे.

राज्यातील महानगरपालिकांच्या स्थावर मालमत्ता व नगरपरिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरीतील मालमत्ता भाडेपट्ट्याने देण्याच्या नियमांमध्ये एकवाक्यता आणण्यात येणार आहे. त्याकरिता नवीन दरांबाबत अधिसूचना काढण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. राज्यातील महानगरपालिकांच्या स्थावर मालमत्ता भाडेपट्ट्याने देणे, त्यांचे नूतनीकरण व हस्तांतरण याबाबत ६ नोव्हेंबर २०२३ रोजी नियम निश्चित करण्यात आले आहेत. त्यालाच अनुसरून आता राज्यातील सर्व नागरी स्थानिक संस्थांतील मालमत्तांच्या हस्तांतरणांत एकवाक्यता आणण्यात येणार आहे. त्यासाठी महानगरपालिका मालमत्ता हस्तांतरण नियमावलीच्या धर्तीवर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी (स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण) (सुधारणा) नियम २०२५ निश्चित करण्यात येणार आहेत.

नगरपरिषद, नगरपंचायत, औद्योगिक नगरी यांच्या मालमत्तांचे निवासी, शैक्षणिक, धर्मादाय व सार्वजनिक, व्यावसायिक व औद्योगिक असे वर्गीकरण करण्यात आले आहे. यात सुधारित नियमानुसार निवासी, शैक्षणिक, धर्मादाय व सार्वजनिक वापरासाठीच्या मालमत्तांचा भाडेपट्टा दर हा वर्तमान बाजारमूल्याच्या (रेडी रेकनर)०.५ टक्के पेक्षा कमी असणार नाही. तसेच व्यावसायिक व औद्योगिक वापरासाठीच्या मालमत्तेचा बाजारमूल्याच्या ०.७ टक्के पेक्षा कमी असणार अशी तरतूद करण्यास आज मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. नगरपरिषदांच्या मालमत्तांचे अधिमुल्य, भाडेपट्टा दर व सुरक्षा ठेव निश्चिती ही संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय समिती करेल. सदर नियमांबाबत हरकती व सूचना मागविण्यात येतील व त्यानंतर अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येईल.

### वसुलीसाठी अभय योजना

राज्यातील नगरपरिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरी क्षेत्रातील थकीत मालमत्ता कर वसूलीकरीता दंड माफ करून वसूली वाढविण्यासाठी अभय योजना लागू करण्यास आज मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी क्षेत्रातील मालमत्तांच्या थकीत करांवर दरमहा दोन टक्के दंड लावण्याची तरतूद आहे. यामुळे मालमत्ता धारकाच्या एकूण थकबाकीमध्ये वाढ होऊन दंडाची ही रक्कम अनेकदा मूळ कराच्या रकमेपेक्षा अधिक होते. मूळ कराच्या रकमेपेक्षा दंडाची रक्कम अधिक झाल्याने मालमत्ताधारक कर भरण्यास टाळाटाळ करतात. यावर उपाय म्हणून थकीत मालमत्ता करावरील दंड माफ करून अभय योजना लागू करण्यात येणार आहे. यापुर्वीच्या अधिनियमात अशा दंड माफीची तरतूद नाही. तशी तरतूद अधिनियमात करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

## SPOT NEWS

### केएसबी संकेतस्थळाच्या दुरूस्तीचे काम सुरू

● **नगर** – माजी सैनिकांसाठी असलेल्या केएसबी संकेतस्थळाच्या दुरुस्तीचे काम सुरु असून यासाठी २ ते ३ महिन्यांचा कालावधी लागणार आहे. या कालावधीमध्ये संकेतस्थळावरुन कुठल्याही प्रकारची कामे होणार नसून दुरुस्तीसाठी लागणारा कालावधी माजी सैनिकांना पुढे वाढवून देण्यात येणार आहे, याची सर्व माजी सैनिक, माजी सैनिक विधवा यांनी नोंद घ्यावी, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अहिल्यानगर यांनी कळविले आहे.

### कामगारांना नोंदणी करण्याचे आवाहन

● **नगर** – कामगार व रोजगार मंत्रालय व राज्य सरकारच्या सहकार्याने ७ ते १७ एप्रिल २०२५ दरम्यान कामगारांसाठी विशेष नोंदणी मोहिम राबविण्यात येत असून गिग व प्लॅटफॉर्म कामगारांनी ई–श्रम पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन बीडी कामगार दवाखान्याचे वैद्यकीय अधिकारी यांनी केले आहे. आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेंतर्गत व्यापक स्वरुपात आरोग्यविमा प्रदान करण्याच्यादृष्टीने हे अभियान राबविण्यात येत असून शेअरिंग वाहन कामगार, अन्न व किराणा पुरवठा करणारे कामगार, लॉजिस्टीक सेवा देणारे मेझॉन, झोमॅटो यासारख्या ऑनलाईन सेवा देणाऱ्या कामगारांनी https://register.eshram.gov.in या पोर्टलवर नोंदणी करावी, असेही कळविण्यात आले आहे.

### एसटी कर्मचाऱ्या खात्यावर ४४ टक्के वेतन जमा

● **मुंबई** – एसटी कर्मचाऱ्यांचे थकीत ४४ टक्के वेतन खात्यावर जमा करण्यात आले. या आधी मार्च महिन्याचे केवळ ५६ टक्के वेतन देण्यात आले होते. त्यावरून एसटी कर्मचाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच विरोधकांनीही राज्य सरकारला चांगलेच धारेवर धरले होते. आता राज्य सरकारकडून उर्वरित वेतन एसटी कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले. या आधी एसटी कर्मचाऱ्यांना केवळ ५६ टक्केच वेतन दिल्यानंतर महामंडळ आणि राज्य सरकारला मोठ्या रोषाला सामोरे जावे लागले होते. त्यानंतर परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी वित्त विभागाकडे बोट दाखवत नाराजी व्यक्त केली होती. आमच्या फाईल्स या अर्थ खात्याच्या अधिकाऱ्यांकडून अर्थमंत्र्यांपर्यंत पोहोचतच नाहीत. त्या परस्पर परत पाठवल्या जातात, असे सांगत त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीही भेट घेतली होती. एसटी कर्मचाऱ्यांचा पगार दर महिन्याच्या ७ तारखेला होण्यासाठी आपण ५ तारखेलाच अर्थमंत्रालयात ठाण मांडू, असेही ते म्हणाले होते.

## यावर्षीचा 'राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी' पुरस्कार प्रमोद म्हस्के यांना जाहीर

### राज्य शासनाकडून सन २०२३, सन २०२४ चे पुरस्कारार्थींची नावे जाहीर

● **नगर । वीरभूमी –**
महाराष्ट्र राज्य शासनाच्यावतीने देण्यात येणारे 'राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी' पुरस्कार जाहीर झाले असून सन २०२२-२३ व सन २०२३-२४ चे पुरस्कार जाहीर केले आहेत. यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातून यावर्षीचा पुरस्कार कासार पिंपळगाव (ता. पाथर्डी) ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक प्रमोद आसाराम म्हस्के यांना तर मागील वर्षीचा पुरस्कार तिगाव (ता. संगमनेर) ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक सतिष भाऊसाहेब गाडेकर यांना जाहीर झाला आहे.



राज्य शासनाच्यावतीने शासन निर्णयाद्वारे पुरस्कारार्थींची यादी आज जाहीर केली आहे. यामध्ये कोकण, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर विभागातून मागील वर्षी ३३ व यावर्षी ३२ जणांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

यावर्षीचा नाशिक विभागातून अहिल्यानगर जिल्ह्यातून 'राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी' पुरस्कार कासार पिंपळगाव (ता. पाथर्डी) ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक प्रमोद आसाराम म्हस्के यांना तर मागील वर्षीचा पुरस्कार तिगाव (ता. संगमनेर) ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक सतिष भाऊसाहेब गाडेकर यांना जाहीर झाला आहे.

लवकरच या पुरस्काराचे वितरण यशवंत पंचायत अभियान पुरस्कार वितरण सोहळ्यात ग्रामविकास मंत्र्यांच्या उपस्थित करण्यात येणार आहे. त्याच्या नियोजनासाठी एक समितीही स्थापन करण्यात आली आहे.

ग्रामसेवक प्रमोद म्हस्के यांना या अगोदर जिल्हास्तरीय आदर्श ग्रमसेवक पुरस्कारही मिळालेला आहे. त्यांनी या अगोदर कासार पिंपळगावला स्मार्ट ग्राम, निर्मलग्राम पुरस्कार मिळवून दिले आहेत. पुरस्कार मिळाल्याबद्दल ग्रामसेवक म्हस्के व गाडेकर यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## शेतकऱ्यांना जबर धक्का : भूसंपादन मोबदल्याच्या विलंबापोटी दिल्या जाणाऱ्या व्याजात ६ टक्के कपात

● **मुंबई। वीरभूमी –**
शेतकऱ्यांकडून घेतलेल्या जमिनीचा मोबदला देण्यास विलंब लागला तर शेतकऱ्यांना त्यावर १५ टक्के व्याज मिळत होते. त्यात कपात करून यापुढे थकीत मोबदल्यावर केवळ ९ टक्के व्याज देण्याचा निर्णय राज्य मंत्रीमंडळाच बैठकीत घेण्यात आला. हा व्याज दर बँकांसाठीच्या व्याज दरापेक्षा (रेपो रेट) एक टक्क्यांनी अधिक असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. यासाठी कायद्यात सुधारणा करावी लागणार असून त्याबाबतचे विधेयक आणण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

**राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय**

विविध सार्वजनिक, शासकीय, निमशासकीय प्रकल्पांसाठी भूसंपादन करण्यासाठी उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ स्वीकारला आहे. या कायद्यातील तरतुदीनुसार होणा–या भूसंपादनामुळे जमीन मालकांना चांगला मोबदला आणि पुनर्वसन आणि पुनर्स्थापना होत असल्याने विरोधाचे प्रमाण खूप कमी झाले आहे. या अधिनियमात जमीन मालकांना भूसंपादनाचा मोबदला देण्यास विलंब झाल्यास कलम ३०(३) अनुसार १२ टक्के आणि कलम ७२ आणि कलम ८० अनुसार नऊ टक्के आणि १५ टक्के व्याज देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

मात्र यामुळे शासनाच्या तिजोरीवर बोजा पडून प्रकल्पांच्या मूळ खर्चात वाढ होत असे. आता या व्याजदरात बदल करून भूसंपादनाचा मोबदला देण्यास विलंब झाल्यास त्या रकमेवर सरसकट एकाच दराने व्याज देण्यात येईल. हा दर बँकासाठीच्या व्याज दराहून एक टक्के अधिक असेल.

थकीत मोबदल्यावर या दराने दरसाल दर शेकडा प्रमाणे व्याज आकारण्याची तरतूद करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. याबाबत विधेयक विधिमंडळात मांडण्यात येईल.

राज्याची आर्थिक स्थिती अतिशय नाजूक असून वेळेत शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला देणे शक्य होणार नाही. त्यामुळेच व्याजाचा भार कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## ऋतुराज, दुबे, जैस्वालला क्रीडा पुरस्कार जाहीर

### ८९ जणांना राज्य सरकारचा क्रीडा पुरस्कार

● **मुंबई । वीरभूमी –**
सन २०२३-२४ च्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराची घोषणा क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज मंत्रालयात केली. माजी राष्ट्रीय कबड्डीपटू, संघटक शंकुतला खटावकर यांना जीवनगौरव तर पॅरा ऑलिम्पिक पदक विजेता सचिन खिलारी, जागतिक विजेते आर्चर आदिती स्वामी, ओजस देवतळे, क्रिकेटपटू शिवम दुबे, ऋतुराज गायकवाड, यशस्वी जैस्वाल यांना शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने गौरवित केले जाणार आहे. एकूण ८९ पुरस्कारांची घोषणा आज करण्यात आली.

पुण्यात शुक्रवार १८ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता म्हाळुंगे बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पुरस्कार समारंभ होईल. या प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रिय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, उपसभापती डॉ. नीलम गो-हे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. अप्पर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर व क्रीडा आयुक्त हिरालाल सोनवणे यांचीही उपस्थिती लाभणार आहे.

मुंबईत आज शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कारासह उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक–जिजामाता पुरस्कार, खेळाडूंसाठीचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा साहसी पुरस्कार, दिव्यांग खेळाडूंचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार अशा एकूण ८९ पुरस्काराची घोषणा करण्यात आली. १८ खेळाडूंना थेट पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. जीवन गौरवसाठी ५ लाख, शिवछत्रपती पुरस्कारासाठी ३ लाख रूपये व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

### फेसबुक, व्हॉटसॲप झुकेरबर्गच्या हातून जाणार?

● **नवी दिल्ली । वीरभूमी –**
सोशल मीडिया प्लॅटफॉर्म फेसबुक, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्रामचे मालक मार्क झुकरबर्ग यांच्या अडचणी वाढल्या आहेत. लवकरच त्यांना आपली कंपनी विकावी लागू शकते, अशी चर्चा आहे. फेसबुक, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम या तिघांची मूळ कंपनी मेटा आहे. या मेटाविरुद्ध वॉशिंग्टनमध्ये अविश्वास खटला दाखल करण्यात आला आहे. या खटल्याद्वारे यूएस फेडरल ट्रेड कमिशन झुकरबर्ग यांना इंस्टाग्राम आणि व्हॉट्सॲप विकावे लागू शकते. अमेरिकन नियामकाचा असा विश्वास आहे की खटला ३७ दिवसांत संपू शकतो आणि त्यानंतर मार्क झुकरबर्ग यांना त्याच्या कंपन्यांबाबत निर्णय घ्यावा लागेल. अमेरिकन नियामकाने मेटावर केलेली ही आतापर्यंतची सर्वात आक्रमक कारवाई आहे. फेसबुकची मूळ कंपनी मेटावर यूएस फेडरल ट्रेड कमिशन अर्थात एफटीसीने इंस्टाग्राम आणि व्हॉट्सॲपच्या अधिग्रहणावर मक्तेदारी निर्माण केल्याचा आरोप केला आहे. त्यावरूनच अविश्वास खटला सुरू आहे.

## जल व्यवस्थापनाच्या जनजागृतीत सक्रिय सहभाग घ्या

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस । 'जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचे' मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

● **नगर । वीरभूमी–**
जलसाक्षरता वाढवणे, पाण्याच्या बचतीचे महत्व पटवून देणे आणि जलव्यवस्थापनाच्या शाश्वत उपाययोजना राबविण्यासाठी जलसंपदा विभागाच्यावतीने 'जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचा' शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत आज झाले. जल व्यवस्थापन कृती पंधरवड्यातील कार्यक्रमांमध्ये प्रत्येक पालकमंत्री महोदयांनी सक्रिय सहभागी घेऊन कामे करून घेण्याचे आवाहन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी केले.

जलसंपदा विभागाच्या वतीने १५ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत 'जलव्यवस्थापन कृती पंधरवडा' साजरा केला जाणार आहे. या पंधरवड्याचे उद्घाटन मंत्रालयातील मंत्रीमंडळ सभागृहात झाला. त्यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे–पाटील, जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य



मंत्री, मुख्य सचिव सुजाता सौनिक, अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव संजय बेलसरे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याच्या पोस्टरचे अनावरण झाले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, जलव्यवस्थापन कृती पंधरवड्याच्या माध्यमातून समाजात पाण्याच्या सुयोग्य वापराबाबत जनजागृती वाढविण्यात यावी. राज्यातील सिंचन व बिगर सिंचनासाठी आवश्यक पाण्याचा प्रश्न सोडविण्याचे सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. परंतु लोकप्रतिनिधी व नागरिकांच्या सक्रिय सहभागाशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. त्यामुळे हा उपक्रम लोकाभिमुख करण्यासाठी सर्व यंत्रणा व घटकांनी सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यानी केले.

# SPOT NEWS



## मदन चन्ने यांना राज्यस्तरीय गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार प्रदान

● **पाथर्डी । वीरभूमी –**

शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या पाथर्डी तालुक्यातील दुलेचांदगाव येथील सच्चिदानंद बंडोबा महाराज माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक मदन तुकाराम चन्ने यांना सन २०२५ चा राज्यस्तरीय गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सन्मान सोहळा नुकताच दापोली येथे पार पडला. यावेळी चन्ने यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, मुख्याध्यापक मंडळाचे अध्यक्ष तानाजी माने आणि अधिवेशन अध्यक्ष सुनील पंडित यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यानिमित्त मुख्याध्यापक मदन चन्ने यांचे यशवंत ग्रामसेवक प्रतिष्ठानचे अध्यक्ष आमदार शिवाजीराव गर्जे, सचिव ॲड. अंकुशराव गर्जे, तालुका मुख्याध्यापक संघ आदींनी अभिनंदन केले आहे.

## कोपरगावात राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने महामानवाला अभिवादन



● **कोपरगाव । वीरभूमी –**

संपूर्ण कोपरगाव मतदार संघात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त कोपरगाव येथे आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रावादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कोपरगाव शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवक, कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राहुरी येथील विद्या मंदिर प्रशालेच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळा



● **राहुरी । वीरभूमी –**

विद्या मंदिर प्रशाला राहुरी या शाळेच्या १९९४ साली इयत्ता दहावी मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा ३१ वर्षानंतर नुकताच पार पडला. ऋणानुबंध १९९४ च्या गेट-टुगेदरची चर्चा संपूर्ण राहुरी शहरांमध्ये केली जात आहे. एखाद्या शाही विवाहाला देखील लाजवेल अशा प्रकारचे नियोजन या माजी विद्यार्थ्यांनी केले. गुजरात, मुंबई, बुलढाणा, ठाणे, पुणे, नाशिक, धुळे, अहिल्यानगर येथे सध्या कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी या गेट-टुगेदरचे नियोजन केले. गेट-टुगेदरच्या निमित्ताने या सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी जवळ पास शंभर माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महादेव बढे, शिवप्रसाद कोहकडे, अशोक कदम, प्रविण फुगारे, मंगेश दंडवते, रमेश म्हसे, नानासाहेब वराळे, समीर शेख, रमेश पाटील, मंगेश बोरकर, निसार आतार, ॲड. पल्लवी कांबळे, अर्चना भट्टड, प्रतिभा बोरूडे, स्मिता गव्हाणे व ऋणानुबंध १९९४ च्या ग्रुप मधील सर्वच माजी विद्यार्थ्यांनी मोठे परिश्रम घेतले. सूत्रसंचलन प्रतिभा बोरूडे यांनी केले तर मच्छिंद्र गुंड आणि मंदार जोशी यांनी आभार मानले.

# विरभद्र पतसंस्था संचालक मंडळाची निवड बिनविरोध

### लोकनेते माजी आ. बाळासाहेब थोरात यांचेकडून नूतन पदाधिकारी व संचालक मंडळाला शुभेच्छा

● **संगमनेर । वीरभूमी –**

संगमनेर तालुक्यात राजकीयदृष्ट्या अतिशय महत्त्वाच्या व प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या निमज येथील विरभद्र नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली बिनविरोध झाली आहे.



माजी मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली या पतसंस्थेने कायम सभासद व कर्जदारांचे हित जोपासत आर्थिक दृष्ट्या चांगली प्रगती साधली आहे. आणि आता या पतसंस्थेच्या संचालक मंडळाची लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली बिनविरोध निवड झाली आहे. यात चेअरमन म्हणून संतोष सुभाष डोंगरे तर तर व्हा. चेअरमनपदी दिलीप विठ्ठल कासार यांची निवड झाली आहे. तर संचालक म्हणून बापूसाहेब शिंदे, मंगेश मतकर, रोहिदास डोंगरे, नितीन डोंगरे, संतोष गुंजाळ, शरद येवले, मीना अडांगळे, स्वाती डोंगरे, सुनंदा कासार यांची निवड झाली आहे.

ही निवडणूक बिनविरोध पार पाडण्यासाठी शेतकी संघाचे चेअरमन संपतराव डोंगरे, निमज वि.का सोसायटीचे चेअरमन तुकाराम गुंजाळ, पतसंस्थेचे माजी चेअरमन गंगाधर डोंगरे, तंटामुक्ती अध्यक्ष विलासराव कासार, ग्रामपंचायत उपसरपंच अरुण गुंजाळ यांनी विशेष परिश्रम घेतले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून चतुरे साहेब यांनी काम पाहिले.

यावेळी कैलास कासार, शंकर डोंगरे, विष्णू मुरलीधर डोंगरे, पाराजी डोंगरे, शांताराम गुंजाळ, शांताराम डोंगरे, सागर डोंगरे, राजेंद्र बोडके, निमज ग्रामपंचायतचे सर्व विद्यमान सदस्य, वि. का. सेवा सोसायटीचे सर्व संचालक, वीरभद्र दूध उत्पादक संस्थेचे सर्व संचालक मंडळ, वीरभद्र शिक्षण प्रसारक संस्थेची सर्व विश्वस्त, गावातील ज्येष्ठ व तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या नूतन संचालक मंडळाचे काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य लोकनेते बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे, कारखान्याचे संचालक इंद्रजीतभाऊ थोरात, कॅन्सरतज्ञ डॉ. जयश्री थोरात, रामहरी कातोरे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## बम बम भोलेच्या गजरात खोलेश्वराला जलाभिषेक

● **पाथर्डी । वीरभूमी–**

महाभारत कालीन प्राचीन देवस्थान असलेल्या पाथर्डीचे ग्रामदैवत व एकमेव पूर्वाभिमूख शिवलिंग असलेले श्री खोलेश्वर महादेवाच्या यात्रेस आजपासून मोठ्या उत्साहात सुरुवात झाली.



सोमवार पासून सुरु झालेल्या या यात्रोत्सवात पैठणहुन आणलेल्या गंगाजलाने खोलेश्वर महादेवाला सोमवारी दुपारी १२ वा जलाभिषेक करण्यात आला. त्याआधी कावड यात्रेकरुची शहरातुन सवाद्य मिरवणुक काढण्यात आली. रात्री ह. भ. प. बिभीषन महाराज अंधुरे जामखेडकर यांचे जाहीर हरीकिर्तन झाले. मंगळवारी रात्री शहरातून पालखी (छबिना) मिरवणूक काढण्यात येईल बुधवारी सालाबाद प्रमाणे खोलेश्वर मंदिर परिसरात आठवडे बाजार यात्रा भरणार आहे. वर्षभरातील एक आठवडे बाजार यात्रेच्या दिवशी येथे भरवण्याची शेकडो वर्षांची परंपरा आहे. या दिवशी लक्ष्मी (झाडू) खरेदी करण्याची देखील प्रथा आहे, या यात्रेत लक्ष्मी (झाडू) खरेदी केल्यास वर्षभर सुख समृद्धी, संपत्ती नांदते असे जाणकार सांगतात. रात्री नामवंत भारुड सम्राट तानाजी कुंभार सातारकर यांचा भारुडाचा कार्यक्रम होईल.

गुरुवारी दुपारी २ वाजता भव्य कुस्ती हंगामा भरवण्यात येणार असून या स्पर्धेसाठी भव्य असा कुस्ती आखाडा तयार करण्यात आला आहे यानंतर यात्रेची सांगता होईल. श्री खोलेश्वर महादेव मंदिर पांडवकालीन अत्यंत प्राचीन मंदिर असून हे मंदिर दोन नद्यांच्या संगमावर बसलेले आहे. पूर्वीच्या काळी असलेल्या स्मशानभूमीत बारवावर हे मंदिर बांधण्यात आले आहे. तसेच मंदिरातील शिवलिंग पूर्वाभिमुख आहे. हे देवस्थान अत्यंत जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असुन भाविकांच्या मनोकामना येथे पूर्ण होतात. यात्रा उत्सव समितीचे अध्यक्ष श्रीहरी बोरुडे, देवस्थान समितीचे अध्यक्ष बाळासाहेब जिरेसाळ तसेच आजिनाथ डोमकावळे, बाबा दुधाळ, शुभम सुपेकर, किशोर बोरुडे, ओम चव्हाण, शुभम तुपे, राजेंद्र उदारे, उमेश केकान, बबलू बोरुडे, ऋषिकेश पानगे, गणेश नांगरे, विजय शिंदे, प्रसाद बोरुडे, आदित्य डोमकावळे, सतीश काटे, शिवा डोमकावळे, यात्र व्यवस्थेसाठी परिश्रम घेत आहेत.

## कोपरगाव महावितरणमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांची संयुक्तीक जयंती उत्साहात साजरी

● **कोपरगाव । वीरभूमी –**

महावितरणच्या पॉवर हाऊस येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांची संयुक्त जयंती वरिष्ठ तंत्रज्ञ महादेव दिवटे, (राहाता) यांच्या अध्यक्षतेखाली अतिशय मोठ्या उत्साहात संपन्न झाली.



या संयुक्त जयंती महोत्सवासाठी प्रा. अनिल पावटे हे मार्गदर्शन करण्यासाठी प्रामुख्याने उपस्थित होते. त्याचबरोबर शहरचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. धांडे, ग्रामीणचे सहाय्यक अभियंता हर्षद बावा, स्वतंत्र बहुजन वीज कर्मचारी संघटनेचे केंद्रीय सरचिटणीस जालिंदर पांढरे यांनी मार्गदर्शन केले.

संदीप जाधव यांनी प्रास्ताविकामध्ये पॉवर हाऊस कोपरगावमध्ये होणाऱ्या या संयुक्त जयंतीचे महत्त्व याची सुरुवात व या अनुषंगाने अनेक वीज कर्मचाऱ्यांपर्यंत फुले शाहू आंबेडकरी विचार पसरवण्यासाठी होणारा उपयोग नमूद केला. वेदश्री सानप यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेवर अतिशय मौलिक असे भाषण सादर केले आहे, आलेल्या मान्यवरांचे सन्मान बाबासाहेबांच्या विचारांचे बहुजन ऊर्जा स्मरणिका हे पुस्तक देऊन एक वेगळा आदर्श निर्माण करत स्वागत केले. हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी आयोजक समिति सदस्य, सतीश देसाई, राजेंद्र भोसले, एकनाथ शार्दुल, सिताराम खंडागळे, कैलास पवार, दिनेश राजपूत, शाम ओढेकर, संतोष पवार, किरण अत्रे, विशाल लकारे, राजेंद्र निकम, अतुल वनकर, कुलदीप सुरतकर, शाहरुख सय्यद, सागर गायकवाड, रवी भुजबळ, हरिभाऊ चौथमल तसेच महिला सदस्या सुवर्ण आहेर, काजल तरजुले, रश्मी ढोक यांनी अतिशय मोलाचे कष्ट घेतले.

यावेळी अभियंता प्रशांत बोंडखळ, अनिकेत निर्भवने, अमोल बोडखे तसेच धीरज भिंगारदिवे, नानाभाऊ गोरडे, मयुर अष्टेकर सुनील फापळे, प्रसन्नजीत बर्डे प्रामुख्याने उपस्थित होते. स्वतंत्र बहुजन वीज कर्मचारी सहकारी पतसंस्था कोपरगाव पतसंस्थेचे चेअरमन धनंजय बंद्रे यांनी उपस्थितीत सर्वांचे आभार मानले.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामान्य माणसाला जगण्याचे साधन दिले

### आ. डॉ. किरण लहामटे । अकोलेत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती महोत्सव साजरा

● **अकोले । प्रतिनिधी–**

जगातील सर्वात मोठी लोकशाही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिली आहे. त्यामुळेच आज भारतासह जगभरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती उत्साहात साजरी होत आहे. ज्यांनी सामान्य माणसाला जगण्याचे साधन दिले त्याचे अस्तित्व निर्माण केले अश्या महामानवाचे उपकार कदापीही विसरता येणार नाहीत, असे प्रतिपादन आमदार डॉ. किरण लहामटे यांनी व्यक्त केले.

अकोले शहरातील महात्मा फुले चौकात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती महोत्सव आरपीआय नेते विजयराव वाकचौरे यांच्या संकल्पनेने साजरा करण्यात आला. यावेळी सर्व मान्यवरानी डॉ. आंबेडकर याच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले तसेच संविधान सर्वांना वाटण्यात आले. याप्रसंगी आ. लहामटे बोलत होते.

यावेळी अभिनव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ज्येष्ठ नेते मधुकरराव नवले, कम्युनिस्ट शेतकरी नेते डॉ. अजित नवले, पोलिस निरिक्षक मोहन बोरसे, शाहिदभाई फारुखी, राष्ट्रवादीचे युवक अध्यक्ष अक्षय अभाळे, ॲड. वसंतराव मनकर, नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, पं.स. बीडिओ श्री. माने, नगरसेविका सोनालीताई नाईकवाडी, शिवसेना तालुकाध्यक्ष मच्छिंद्र धुमाळ, नितिन नाईकवाडी, संभाजी ब्रिगेडचे डॉ. संदिप कडलग, संतोष देठे व सर्वधर्मीय, सर्वपक्षीय कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना आ. लहामटे म्हणाले की, आज या गोष्टींचा आनंद होत आहे की, पक्षभेद बाजूला सारून संविधान महत्वाचे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरा यांचे विचाराबरोबर फुले, शाहू, छत्रपती शिवाजी महाराज, राघोजी भांगरे, राया ठाकूर यांचे विचार महत्वाचे. हा विचार घेऊन आपला तालुका पुढे जात आहे. तालुका एकसंघ आहे. तालुक्याने कायम जाती-पातीच्या राजकारणाला वाव दिली नाही व यापुढेही जाती-पातीच्या राजकारणाला मुठ-माती देईल असा विश्वास व्यक्त करत आजच्या दिनी संकल्प करु या की, भविष्यात तालुक्यात पूर्वजांनी जो जातीय सलोखा जपला आहे तो यापुढेही जपुया डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आत्मसात करु ते विचार कृतीत आणुया अशी अपेक्षा व्यक्त केली.



यावेळी आरपीआय नेते विजयराव वाकचौरे म्हणाले की, आज संविधानाची माहिती असणे फार गरजेची आहे. प्रत्येकाला संविधानातील हक्क व कर्तव्य माहिती असले पाहिजे, त्यामुळे आज महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने तालुक्यतील प्रत्येक घरोघरी संविधान वाटण्याचा आमचा संकल्प असुन त्याची आज सुरुवात करत असल्याचे सांगितले.

## कुरुंदच्या शाळेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना दाखवले जादूचे प्रयोग

### अरुण वाळुंज टॉकसचा उपक्रम । जादूगार प्रकाश शिरोळेंचे दमदार सादरीकरण

● **नगर । वीरभूमी–**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे औचित्य साधत फुले आंबेडकर विचार संवर्धन समिती शिरूर संचलित कुरुंद येथील शाळेत जादूच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अरुण वाळुंज टॉकसचा उपक्रम असलेला व महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध जादूगार प्रकाश शिरोळे यांनी सादर केलेल्या कार्यक्रमाचे उदघाटन संस्थेचे सहसचिव व कार्यक्रमाचे अध्यक्ष सतीश गायकवाड यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.



विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी असे कार्यक्रम आयोजित करण्याचे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य शाकीर शेख यांनी केले व आभार व्यक्त करताना संस्थेतील विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास करण्यासाठी अष्टपैलू कार्यक्रम आयोजित करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. यावेळी मुख्याध्यापिका उज्वला औटी, मुख्याध्यापक श्री. रणधीर आहेर, मुख्याध्यापक श्री. मधुकर खोडदे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

टाळया हास्य अन आनंदाचा मिलाफ जादूच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी अनुभवला. जादूगार प्रकाश शिरोळे यांच्या कार्यक्रमाच्या सादरीकरणाची पद्धत व सहजता याने प्रेक्षकांची मने जिंकली. जादूमागे हातचलाखी व विज्ञान असते. त्यामुळे अंधश्रद्धा न बाळगता आयुष्यात पुढे जा असे मार्गदर्शन जादूगार प्रकाश शिरोळे यांनी व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व साहित्य सर्वांनी वाचावे व विविध कलागुणांना वाव देण्यासाठी असे नवनवे उपक्रम संस्थेसाठी व महाराष्ट्रभर आयोजित करण्यासाठी प्रयत्नशील राहू असा विश्वास अरुण वाळुंज टॉकसचे सर्वेसर्वा सुप्रसिद्ध चित्रपट गीतकार अरुण वाळुंज यांनी व्यक्त केले.

## डॉ. विखे पाटील आय.टी.आय. मध्ये

# इंन्फोसिस स्प्रिंगबोर्ड ‘स्किल ऑन व्हिल्स’ उपक्रम

● **नगर । प्रतिनिधी–**

अहिल्यानगर येथील डॉ. विखे पाटील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड या कंपनीमार्फत राबविण्यात आलेल्या ‘स्किल ऑन व्हिल्स’ या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. एलईडी स्क्रीन व लॅपटॉपच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने प्रभावी प्रशिक्षण देण्यात आले.



या उपक्रमाचे उद्घाटन डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे टेक्निकल डायरेक्टर श्री. सुनील कल्हापुरे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रशिक्षणात इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक, इलेक्ट्रीशियन, वायरमन तसेच कॉम्प्युटर ऑपरेटर अँड प्रोग्रॅमिंग असिस्टंट या ट्रेडमधील प्रशिक्षणार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड द्वारे राबविण्यात येणारा ‘मेकर लॅब’ हा उपक्रम २१व्या शतकातील जीवनकौशल्ये, नवकल्पनांची ओळख, व वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्याच्या उद्देशाने राबवला जात आहे. व्हिडिओ बेस्ड लर्निंग, असाइनमेंट लर्निंग यासोबतच ट्रॅफिक कंट्रोल सिस्टम, ऑटोमॅटिक स्ट्रीट लाइट कंट्रोल सिस्टीम यांची प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांना दाखवण्यात आली.

उद्घाटन प्रसंगी सुनील कल्हापुरे यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक करत विद्यार्थ्यांसाठी हे प्रशिक्षण भविष्यासाठी उपयोगी ठरणारे असल्याचे सांगितले.

यावेळी संस्थेचे प्राचार्य अनिल सुर्यवंशी, उपप्राचार्य श्री. काकडे, श्री. तुतारे, श्री. बडे, श्री. साठे, श्रीमती नलगे आणि आयटीआयतील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल जलसंपदा मंत्री आणि संस्थेचे चेअरमन राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील, डायरेक्टर जनरल (प्रशासन) डॉ. पी. एम. गायकवाड आणि डायरेक्टर (मेडिकल) डॉ. अभिजीत दिवटे यांनी संस्थेचे अभिनंदन केले आहे.

# SPOT NEWS



## राजकमल पवार-नवले यांना नारीशक्ती पुरस्कार प्रदान

● **अकोले । वीरभूमी–**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ महिला आघाडी अहिल्यानगरच्या वतीने दरवर्षी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा नारीशक्ती पुरस्कार देऊन गौरव केला जातो. यावर्षी अकोले तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सावरगाव पाट येथे कार्यरत करत असलेल्या श्रीमती राजकमल देवचंद नवले–पवार यांना नुकताच नारी शक्ती पुरस्कार ज्येष्ठ कवी, साहित्यिक अशोक नायगावकर यांचे हस्ते अहिल्यानगर येथे प्रदान करण्यात आला. यावेळी संघटनेचे राज्य नेते रावसाहेब रोहोकले गुरुजी, ज्येष्ठ साहित्यिक संजय कळमकर जिल्हाध्यक्ष प्रवीण ठुबे आदी मान्यवर उपस्थित होते. गेल्या पंचवीस वर्षापासून राजकमल पवार शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी राजुर, औरंगपूर अशा शाळांमध्ये उल्लेखनीय काम केले आहे. सध्या त्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सावरगाव पाट येथे कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सहशालेय उपक्रमांबरोबरच विविध स्पर्धा परीक्षांची उत्तम तयारी त्या करून घेत असतात. विद्यार्थ्यांच्या कृतीयुक्त व आनंददायी शिक्षणासाठी त्यांनी शाळांतून विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. अध्यापनात माहिती तंत्रज्ञानाचा वापर त्या प्रभावीपणे करत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्राचे प्राथमिक शिक्षक संघ महिला आघाडी अहिल्यानगरच्या वतीने नुकताच त्यांना नारीशक्ती अहिल्यानगर येथे पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी गणपत सहाणे, बाळासाहेब शेळके, बाळासाहेब तोरमड, भगवान सहाणे, बाळासाहेब सहाणे, गोरक्ष देशमुख, अनिल पवार तसेच तालुक्यातील महिला शिक्षिका मोठ्या प्रमाणावर उपस्थित होत्या.

## निळवंडे वसाहतीमध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



● **अकोले । वीरभूमी–**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संपूर्ण मानव जातीसाठी महान कार्य केले असून दुःखीत, वंचित समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले आहे.त्यांना डोक्यावर घेऊन नाचू नका तर त्यांचे विचार डोक्यात घ्यावे असे प्रतिपादन जेष्ठ नागरिक गंगाराम लेंडे सर यांनी केले. अकोले शहरातील निळवंडे वसाहतीमध्ये महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी श्री. लेंडे मार्गदर्शन करताना बोलत होते. छोटेखानी झालेल्या या कार्यक्रमामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी साहेबराव लांडगे, श्री. पिचड सर, विकास साबळे, वन अधिकारी भास्कर मुठे, पोलीस हवालदार अनिल भांगरे, पंचायत समितीचे सेवा निवृत्त कर्मचारी सीताराम पांडे, बबनराव बांबेरे सर, सखाराम भांगरे, जलसंपदाचे सतीश गांगुर्डे, सौ.सोनाली सतीश गांगुर्डे, ठकाजीराव डगळे, श्री पारधी, प्रदीप लेंडे आदीसह अनेक नागरिक उपस्थित होते. यावेळी गंगाराम लेंडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. शेवटी भास्कर मुठे यांनी सर्वांचे आभार मानले.

# संत श्री शेख महंमद महाराजांच्या मंदिराचा जिर्णोद्धार व्हावा ही सर्व धर्मियांची इच्छा


**घनशाम शेलार । यात्रा समितीवर बिनबुडाचे आरोप करणाऱ्यांविरोधात गुरुवारी भव्य मोर्चा, गाव बंदची घोषणा**

● **श्रीगोंदा । प्रतिनिधी–**

श्रीगोंद्याचे ग्रामदैवत व संपूर्ण देशभरातील भक्तांचे श्रद्धास्थान संत श्री शेख महंमद महाराज यांच्या मंदिराचा अनेक वर्षांपासून रखडलेला जिर्णोद्धार व विकासकामे यांचा जाणीवपूर्वक काही व्यक्ती खोडा घालत असून श्रीगोंदेकरांच्या भक्ती भावनेचा आदर न करता यात्रा उत्सव समितीवर खोटारडे आरोप करत जाणूनबुजून प्रशासनाकडे तक्रारी दाखल करत आहेत. या सर्व प्रकाराला श्रीगोंदा ग्रामवासीय कंटाळले असून या प्रकाराविरोधात अखेरचा व निर्णायक लढा देण्यासाठी येत्या गुरुवार दि. १७ रोजी भव्य मोर्चा, बेमुदत धरणे व गाव बंद आंदोलन करण्याचा निर्धार श्रीगोंदा येथे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते घनशाम शेलार यांच्या निवासस्थानी झालेल्या पत्रकार परिषदेत सर्व यात्रा समिती सदस्य, प्रमुख कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत घोषणा करण्यात आली.

यावेळी घनशाम शेलार, बाबासाहेब भोस, यात्रा समितीचे अध्यक्ष गोपाळराव मोटे, पोपटराव खेतमाळीस, नानासाहेब कोथिंबीरे, सुदाम झुंजरुक, बाळासाहेब दुतारे, राजू गोरे, अजीम जकाते व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी घनशाम शेलार म्हणाले की, अनेक दशकांपासून संत श्री शेख महंमद महाराज मंदिराचा जिर्णोद्धार महाराजांचेच वंशज असलेल्या व्यक्तींनी कुणाला विश्वासात न घेता शेख महंमद बाबा दर्गाह ट्रस्ट स्थापन करून कायदेशीर अडथळे आणल्यामुळे होऊ शकत नाही. संत श्री



शेख महंमद महाराज यांनी भागवत धर्माची पताका हाती धरून अनेक ग्रंथांची व भजनांची निर्मिती करून अखेरपर्यंत हिंदू हा मुस्लिम ऐक्य टिकण्यासाठी कीर्तनरुपी सेवा देत समाज प्रबोधन केले आहे. शिर्डी देवस्थानच्या धर्तीवर विकासकामे होऊ द्यावीत. व महाराजांच्या विचारांना तडा देण्याचे काम त्यांच्याच वंशजांकडून होत असल्याची दुर्दैवी बाब आहे.

यावेळी ज्येष्ठ नेते बाबासाहेब भोस म्हणाले की २००८ साली हा वाद चिघळला होता मात्र आम्ही गावकऱ्यांना संयम राखायला लावत दोन समाजात तेढ निर्माण होऊ नये यासाठी आजपर्यंत खूपच धीराने घेतले आहे व पुढेही घेणार आहे. शेख महंमद महाराज यांचा हा दर्गा नसून ते सर्वधर्मीय मंदिरच आहे. याचा दाखला शेकडो वर्षांपासून आहे. आम्ही आजही सामोपचाराने व शांततेच्या मार्गाने यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करत असून महाराजांच्या वंशजांनीही सहकार्याची भूमिका घेऊन मंदिर विकासात अडथळे आणू नये.

यावेळी गोपाळराव मोटे, नाना कोथिंबीरे यांनी सांगितले की गुरुवारी होणारे आंदोलन ही जनभावना असुन त्याचे प्रक्षोभात रुपांतर न होण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहणार आहोत. आमच्या आंदोलनाची सरकार, प्रशासनाने दखल घेऊन तातडीने हा प्रश्न मार्गी लावावा व मंदिराबरोबरच गावाच्या विकासाला येणारे अडथळे दूर करावेत. या आंदोलनात व्यसनमुक्ती प्रवर्तक हभप. बंडातात्या कराडकर, संत तुकाराम महाराजांचे वंशज हभप माणिकराव मोरे व हभप. माऊली महाराज कदम हे सहभागी होणार आहेत.

# जवळे कडलग - वडगाव लांडगा रस्ता लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या पाठपुराव्यातूनच

● **संगमनेर । वीरभूमी–**

संगमनेर तालुक्यातील विविध गावांमधील रस्त्यांकरता लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी २०२४ मध्येच मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून निधी मिळवला आहे या योजनेमधूनच जवळेकडलग ते वडगाव लांडगा या रस्त्याच्या



कामासाठी निधी मंजूर झाला होता अशी माहिती जिल्हा परिषद सदस्य रामहरी कातोरे व विष्णुपंत रहाटळ यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना कातोरे व रहाटळ म्हणाले की, संगमनेर तालुका हा विस्तार आणि मोठा आहे. या तालुक्यातील प्रत्येक गावातील वाडी वस्ती करता लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी मोठा निधी दिला आहे. सातत्याने विकासाच्या योजना राबवल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण विकासातून संगमनेर तालुका हा प्रगतशील तालुक्यांमध्ये ओळखला जातो आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा दोन मधून वडगाव लांडगा ते जवळे कडलग या रस्त्या करता लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी पाठपुरावा करून निधी मिळवला आहे. ज्या रस्त्यांची कामे करावयाची आहे त्या सर्व रस्त्यांचा निधी हा लोकनेते थोरात यांनीच मिळवला आहे.

विद्यमान लोकप्रतिनिधी यांनी आर्थिक वर्ष २०२४ – २५ यासाठी कोणताही निधी मिळवलेला नाही किंबहुना झालेले अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये संगमनेर तालुक्यात काहीच निधी मिळाला नाही. असे पहिल्यांदा घडले आहे की संगमनेर तालुक्याच्या विकास कामांकरता निधी मिळाला नाही.

खरे तर विद्यमान लोकप्रतिनिधी हे सत्ताधारी पक्षाचे आहे परंतु त्यांची त्या पक्षात काही चालत नाही. वडगाव लांडगा येथे येऊन बाराशे कोटींच्या विकास कामांची माहिती त्यांनी दिली. बाराशे कोटींचा निधी मिळवला कधी त्यामध्ये कामे कोणती आहेत हे मात्र कुणाला कळायला मार्ग नाही.

नवीन लोकप्रतिनिधींना निवडून येऊन अजून सहा महिने झाले नाही तर बाराशे कोटी मिळवले कधी किंवा कोणत्या योजनेतील मिळवले त्यांनी ते जनतेला सांगितले पाहिजे विनाकारण दिशाभूल करू नये असेही रहाटळ यांनी म्हटले आहे.

# रयत ‘कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणार

**चंद्रकांत दळवी । रयत शिक्षण संस्थेच्या आरबीएनबी कॉलेज मध्ये प्रशिक्षण**

● **श्रीगोंदा । वीरभूमी–**

एकविसावे शतक हे कृत्रिम बुद्धिमत्तेचे अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे आहे आणि म्हणून रयत शिक्षण संस्था बदलत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर प्रभुत्व मिळवण्यासाठी प्रत्येक शाळा साधनसामुग्रीने अद्यावत केली आहे. जून महिन्यापासून प्रत्येक शाखा इंटरॅक्टिव्ह पॅनल ने समृद्ध असेल खडू आणि फळा या ऐवजी व्हाईट बोर्ड, ग्रीन बोर्ड व इंटरॅक्टिव्ह पॅनल चा उपयोग केला जाईल.

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली १३ धोरणात्मक विषयावर निर्णय घेण्यात आलेले आहेत. त्या माध्यमातून सर्व साडेसातशे शाखांमध्ये ‘एआय‘ हा विषय सुरू करणार व विद्यार्थ्यांना समृद्ध करणार असल्याची माहिती



चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी दिली.

एआय, मशीन लर्निंग, कोडींग, रोबोटिक्स आणि थ्रीडी प्रिंटिंग या विषयांचा समावेश असणार आहे. यावेळी उत्तर विभागाने रयत शिक्षण संस्थेत प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल गुणवत्ता कक्षाच्या कामाचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षिय मनोगत मीनाताई जगधने मॅनेजिंग कौन्सिल सदस्य यांनी ‘एआय’ चे सध्याच्या जीवनातील महत्त्व विशद केले. यावेळी मंचावर डॉ. अनुश दळवी, डॉ मुकुंद पोंधे, डॉ प्रविण बडघे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे स्वागत प्राचार्य सुहास निंबाळकर, प्रास्ताविक उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, आभार प्रदर्शन डॉ. अमरनाथ जगदाळे, सूत्रसंचालन डॉ. योगिता रांधवणे, सुजाता पोखरकर यांनी केले. कार्यक्रमाचे उद्घाटनाचे दीपप्रज्वलन तंत्रस्नेही शिक्षक रवी गांगर्डे यांचे संकल्पनेतून एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून करण्यात आले.

# कोपरगाव तालुक्यात ‘जलसंपदा व्यवस्थापन कृती पंधरवडा’ कार्यक्रम सुरु

● **कोपरगाव । वीरभूमी–**

जल व्यवस्थापनाबाबत जनजागृती व्हावी आणि लोकांना त्याची माहिती मिळावी, या उद्देशातून जलसंवर्धनासाठी सुरु करण्यात आलेल्या जलसंपदा विभागाचा ‘जलसंपदा व्यवस्थापन कृती पंधरवडा’ कार्यक्रम मंगळवार (दि.१५) पासून आ.आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कोपरगाव तालुक्यात सुरु करण्यात आला आहे.

जलसंपदा विभागाच्या वतीने १५ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत ‘जल व्यवस्थापन कृती पंधरवडा’ साजरा केला जात आहे. त्या पार्श्वभूमीवर कोपरगाव तालुक्यात देखील ‘जल व्यवस्थापन कृती पंधरवडा’ राबविण्यात येणार असून या कार्यक्रमाचे उद्घाटन मंगळवार (दि.१५) रोजी तहसीलदार महेश सावंत व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या ‘जल व्यवस्थापन कृती पंधरवाडा’ कार्यक्रमात नागरिकांमध्ये जलसाक्षरता वाढवणे, पाण्याची बचत हि काळाची गरज असून त्याबाबतचे महत्व पटवून देणे आणि जल व्यवस्थापनाच्या शाश्वत उपाययोजना राबवणे यासाठी पाण्याचा योग्य वापर अशा विविध विषयांच्या माध्यमातून नागरीकांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. त्यासाठी नियमितपणे पंधरा दिवस विविध उपक्रम राबविले जाणार असून या पंधरवड्याच्या माध्यमातून जलसाक्षरतेसाठी विविध उपक्रम राबवून जल व्यवस्थापनावर अधिक भर दिला जाणार आहे. लोकाभिमुख कार्यक्रमाच्या माध्यमातून पाणी बचतीच्या बाबतीत जनजागृतीचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

जलसंपदांचा शाश्वत वापर आणि नियोजनबद्ध व्यवस्थापन हे भविष्यातील पिढ्यांसाठी अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी शासनाच्या पुढाकाराबरोबरच लोक–सहभाग, शाळा–महाविद्यालय आणि स्वयंसेवी संस्थांची भूमिका देखील तेवढीच महत्त्वाची असणार आहे. या सर्व महत्वपूर्ण माध्यमांच्या मदतीने राबविण्यात येत असलेले ‘जलसंपदा व्यवस्थापन कृती पंधरवडा’ हे एक सकारात्मक पाऊल असून, भविष्यातील जलसुरक्षेचा पाया भक्कम करण्यासाठी हे एक प्रेरणादायी टप्पा ठरणार असल्याचे यावेळी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले.

यावेळी तहसीलदार महेश सावंत, तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे, उपविभागीय



अभियंता संदीप पाटील, गोदावरी दूध संघाचे दूध संघाचे अध्यक्ष राजेश परजणे, माजी उपसभापती अर्जुनराव काळे, माजी सदस्य मधुकर टेके, राष्ट्रवादी युवकचे जिल्हाध्यक्ष कृष्णा आढाव, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन शंकरराव चव्हाण, संचालक सुधाकर रोहम, दिलीपराव बोरणारे, अनिल कदम, प्रशांत घुले, विष्णु शिंदे, गौतम बँकेचे चेअरमन संजय आगवण, पद्मविभूषण शरदचंद्र पवार पतसंस्थेचे चेअरमन देवेंद्र रोहमारे, संचालक रावसाहेब चौधरी, वीरेंद्र शिंदे, दिलीपराव शिंदे, संचालक बाजार समितीचे माजी संचालक राजेंद्र निकोले, रामदास केकाण, संभाजीराव काळे, आदी मान्यवरांसह नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमृतवाहिनी एमबीएमध्ये अभ्यासक्रमाबरोबरच नैतिक मूल्यांचे शिक्षण

**महेश अय्यर । उडान २०२५ या कार्यक्रमाचे आयोजन**

● **संगमनेर । वीरभूमी–**

माजी शिक्षणमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांचे मार्गदर्शनाखाली अमृतवाहिनी शिक्षण संस्था ही गुणवत्तेच्या बाबतीत देशात नावाजलेली असून अमृतवाहिनीत शैक्षणिक ज्ञानदानाबरोबरच विद्यार्थ्यांना नैतिक मूल्य कशी जोपासावी याचे शिक्षण दिले जात असल्याचे गौरोद्गार पुणे स्थित मेव्हिन आरपीओ सोल्यूशन प्रा. लिमिटेडचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी महेश अय्यर यांनी काढले आहे.

अमृतवाहिनी एमबीए महाविद्यालयात नुकत्याच झालेल्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी संचालक डॉ.बी.एम. लोंढे, समन्वयक डॉ. आर. बी. सातपुते, अकॅडेमिक कॉर्डिनेटर डॉ. एस. के. निंबाळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना महेश अय्यर म्हणाले की, अमृतवाहिनीत शैक्षणिक ज्ञानदानाबरोबरच विद्यार्थ्यांना नैतिक मूल्य कशी जोपासावी, सामाजिक बांधिलकी कशी जपावी तसेच विद्यार्थ्यांनी केवळ आत्मकेंद्रित विचार न करता समाजाभिमुख विचार करून समाजाचा विकास कसा साधता येईल असे नैतिक मूल्यांवर आधारित शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांनी उच्च स्वप्ने उराशी बाळगून ती सत्यात उतरविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करावी. यावेळी जीवन जगण्याचा फॉर्म्युला सांगितला स्वप्न, विश्वास, परिभाषित यश व्यवस्थापित करा म्हणजे सुयश मिळेल. तुम्हीच तुमचा सर्वात मोठा अडथळा आहात. त्यावर मात करा. तुमच्या मनावर गुंतवणूक करा. तुमच्या मर्यादा वाढवा.



तुम्ही स्वतःवर प्रभाव टाकू शकता तुम्ही कोण आहात? तुमचा उद्देश काय आहे? तुमच्या मर्यादा तुमचे जग ओळखा. तुमच्या मर्यादा निवडा, परिभाषित करा. तुमचे स्वतःचे जग तयार करा. जीविनाचे सार्थक करण्यासाठी शिकत रहा, नविन शोधत रहा असे आवाहन केले.

महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. एम. लोंढे म्हणाले कि, अमृतवाहिनी एमबीए महाविद्यालयाची स्थापना स्वर्गीय सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या दूरदृष्टीतून इ.स.१९९४–९५ मध्ये झाली. अमृतवाहिनी महाविद्यालयात शैक्षणिक दृष्ट्या आवश्यक असलेल्या सर्व सुविधा त्यामध्ये स्वतंत्र इमारत, ग्रंथालय, क्रीडांगण, प्लेसमेंट कक्ष, संगणक विभाग, होस्टेल व मेस सुविधा आणि ग्रीन कॅम्पस असल्याचे ते म्हणाले.

यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांना विविध पारितोषिकांनी गौरविण्यात आले. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला उडान २०२५ स्नेहसंमेलनाचे समन्वयक डॉ. आर. बी. सातपुते यांनी कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट करताना त्यात FAREWELL या शब्दातील अर्थबोध स्पष्ट केला. त्यानंतर महाविद्यालयाचे अकॅडेमिक कॉर्डिनेटर डॉ. एस. के. निंबाळकर सर यांनी महाविद्यालयातील अकॅडेमिक आणि विद्यार्थ्यांच्या प्रगती बाबत आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर एमबीए द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी आपले महाविद्यालयाबाबतचे विचार मांडले. त्यामध्ये महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातात, त्यातूनच आमचा सर्वांचा सर्वांगीण विकास घडतो, त्याबद्दल संस्थेचे, महाविद्यालयाचे संचालक व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचे विद्यार्थ्यांनी आभार मानले.

या उडान २०२५ कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एमबीए प्रथम वर्षातील कुमारी. हुरुळे वैष्णवी, अभिषेक जोशी, कुमारी त्रिवेणी खर्डे, गोविंद ख्रिस्ते, यांनी केले तर या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन द्वितीय वर्षातील कुमारी हर्षदा नाईकवाडी या विद्यार्थिनींने केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. एम. लोंढे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग एमबीए प्रथम वर्षातील विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या यशस्वीतेबद्दल अमृतवाहिनी एमबीएच्या सर्व स्टाफचे संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब थोरात (माजी महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य) विश्वस्त आमदार डॉ. सुधीर तांबे, विश्वस्त सौ शरयुताई देशमुख, साखर कारखान्याचे संचालक इंद्रजीत भाऊ थोरात, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, व्यवस्थापक प्रा. व्ही. बी. धुमाळ आणि संस्थेचे डायरेक्टर अकॅडेमिक डॉ.जे.बी. गुरव यांनी अभिनंदन केले.

### यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव

■ मेधा २०२५ मध्ये एमबीएच्या विद्यार्थ्यांनी क्रिकेटमध्ये प्रथम पारितोषिक पटकावले तसेच हॉलीबॉल मध्ये एमबीएच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक पटकावला आणि एमबीएच्या विद्यार्थिनींनी क्रिकेटमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला तसेच मिस्टर प्रतीक कुन्हे, ओम शहाणे आणि गौरव गोसावी यांनी मेधा काईट फेस्टिवल मध्ये प्रथम पारितोषिक पटकावले. कुमारी अवंतिका खैरनार हिने मेधा टॉक शोमध्ये द्वितीय पारितोषिक पटकावले, तर राष्ट्रीय पातळीवरील सफायर मॅरेथॉन लायन्स क्लब संगमनेर आयोजित यामध्ये पंकज वाडेकर याने मेडल पटकाविले अशाप्रकारे विविध स्पर्धामधून सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

## एस. एस. जी. एम. कॉलेजमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त पदयात्रा




● **कोपरगाव । वीरभूमी –**

येथील रयत शिक्षण संस्थेच्या एस. एस. जी. एम. कॉलेजमध्ये भारतरत्न, क्रांतीसूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांच्या हस्ते या महामानवाच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी रयतसेवकांना संबोधित करताना प्रा.किरण पवार यांनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दैदिप्यमान कर्तृत्व, त्यांनी केलेले वाचन, त्यातून केलेले सत्यान्वेषण याबद्दल माहिती देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्य कर्तृत्वाला उजाळा दिला. तसेच, डॉ. आंबेडकरांनी अभ्यासपूर्वक आणि अतिशय परिश्रमाने बनविलेल्या भारतीय संविधानाचे महत्त्व सर्वांनी ध्यानी घ्यावे, असे आवाहन केले.

महाविद्यालयाच्या एन.सी.सी. व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त महाविद्यालय ते शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा पर्यंत पदयात्राचे आयोजन करण्यात आले होते. सदर ठिकाणी मानवाच्यापुतळ्यास पुष्पहार अर्पण करून संविधान संहितेचे वाचन करण्यात आले. या पदयात्रेत रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य व महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मा.श्री.अॅड. संदीप वर्पे यांनी सक्रीय सहभाग नोंदविला.

सदर कार्यक्रमप्रसंगी सर्व विभागांचे उपप्राचार्य सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, कार्यालयीन अधीक्षक सुनील गोसावी, सर्व शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी- विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर–४१४६०१ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# करंजी घाटात पेट्रोलचा टँकर पलटी

## मोठी दुर्घटना टळली । पेट्रोल घेवून जाण्याच्या तयारीत असलेल्यांचा पोलिसांमुळे हिरमोड





**● पाथर्डी । वीरभूमी–**
तालुक्यातील करंजी घाटात अपघातग्रस्त टँकर मधील पेट्रोल गोळा करण्यासाठी जीवावर उदार होऊन पेट्रोल चोरी करणाऱ्या परिसरातील ग्रामस्थांना पोलिसांनी बळाचा वापर करत पीटाळून लावले. ऊन तापण्यापूर्वी अपघात झाल्याने टँकरच्या संभाव्य स्फोटाचा मोठा अनर्थ टळला. सुमारे २० हजार लिटरचा स्फोट एकाच वेळी झाला असता तर, घाट उखडून परिसरातील एक किलोमीटर भर अंतरावरील वाहनांचे मोठे नुकसान झाले असते.

आज सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास मुंबईहून परभणीकडे वीस हजार लिटर पेट्रोल भरून टँकर चालला होता. नेहमीच्या माणिक बाबा अर्धवर्तुळाकार वळणावर टँकरचे ब्रेक नादुरुस्त झाल्याने जागेवर वळण घेत टँकर पलटी झाला. ब्रेक लागले नसल्याने समोरून येणाऱ्या एका स्विफ्ट कारला टँकर घासला. अपघाताचे वृत्त परिसरात कळतात जो तो रिकामे ड्रम दुधाचे कॅन्स बादल्या पत्र्याचे डबे घेऊन अपघात स्थळी धावला पाईपलाईन फुटावी तसा टँकरला दोन ठिकाणी तडे जाऊन पेट्रोल गळती वेगाने सुरू झाली. अपघातानंतर काही वेळात पाथर्डी वरून पोलीस यंत्रणा पोहोचली. सध्या सरासरी तापमान ४० ते ४२ अंश सेल्सिअस पर्यंत असल्याने रस्त्यावरील वाहतूक दुपारनंतर मंदावते.

हा अपघात जर दुपारच्या दरम्यान झाला असता तर तापलेल्या डांबरी सडकेवर पेट्रोल पडल्यावर त्याने पेट घेतला असता. संपूर्ण टँकरचा स्फोट झाला असता असे नागरिकांचे म्हणणे आहे. परिस्थितीचे गांभीर्य बघत पोलिसांनी अहिल्यानगर व पाथर्डी येथून अग्निशमन दलाचे बंब ताबडतोब बोलवले. पाथर्डी पोलीस व महामार्ग पोलिसांनी लोकांची गर्दी हटवत टँकरवर व सडकेवर पाण्याचा मारा केला. सुमारे दोन तास रस्त्यावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प होती. दोन्ही बाजूकडून वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

करंजी बसस्थानक परिसरातील हॉटेलवर बहुतेक वाहन चालक चहा पाण्यासाठी थांबतात. घाटातच वाहतूक कोंडी झाल्याने लोकांना उन्हाचा व उकाड्याचा प्रचंड त्रास झाला. अपघातामध्ये टँकर चालक मकबूल कमल पठाण, राहणार सय्यद मिया पिंपळगाव, जिल्हा परभणी हा गंभीर जखमी झाला. सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश भोये व महामार्ग पोलीस दलाचे उपनिरीक्षक राठोड यांच्यासह पोलिस कॉन्स्टेबल भगवान टकले व इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी वाहतूक सुरळीत होऊन टँकर बाजूला घेण्यासाठी विविध यंत्रणांच्या साह्याने प्रयत्न केले. करंजी घाटातील माणिक बाबा वळण हे अत्यंत धोकादायक असून नेहमी येथे लहान मोठे अपघात होतात. येथील वळण अधिक रुंद होऊन घाट उतरणाऱ्या वाहनांसाठी सुरक्षित व्हायला हवे अशी प्रवाशांची मागणी आहे बहुसंख्य अपघात हे वाहन उतरतानाच झालेले आहेत.

## डॉ. आंबेडकरांचे विचार आत्मसात करून समतेचं आणि सामाजिक बंधुत्वाचं स्वप्न साकार करावं : माजी आ. काळे

### काळे कारखाना कार्यस्थळावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



**● कोपरगाव । वीरभूमी–**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारताच्या संविधानाचे शिल्पकारच नव्हते, तर त्यांच्या विचारांचा पाया हा समानता, बंधुता, व स्वातंत्र्य या तत्वावर आधारित होता ते महान विचारवंत होते. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आज आपल्याला लोकशाही, स्वतंत्र विचार आणि मूलभूत हक्कांची जाणीव आहे. आजच्या तरुण पिढीने त्यांचे विचार आत्मसात करून समतेचं आणि सामाजिक बंधुत्वाचं स्वप्न साकार करावं, हीच त्यांना खरी आदरांजली ठरणार आहे असे प्रतिपादन माजी आमदार अशोकरावजी काळे यांनी केले.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती कर्मवीर शंकरराव काळे कारखाना कार्यस्थळावर मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी कारखाना व उद्योग समुहाचे मार्गदर्शक माजी आमदार अशोकरावजी काळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी ते बोलत होते. ते म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केवळ दलित समाजासाठीच नव्हे तर संपूर्ण भारतासाठी समता, बंधुता आणि न्यायाचे तत्वज्ञान दिले. भारताच्या राज्यघटनेचे मुख्य शिल्पकार म्हणून त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा व त्यांनी शिक्षणाच्या जोरावर माणूस स्वत:ची ओळख तयार करु शकतो व अन्याया विरुद्ध लढू शकतो त्यांचे हे बहुमुल्य विचार आजही नव्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी कारखान्याचे प्रभारी कार्यकारी संचालक सुनिलज कोल्हे, सेक्रेटरी बी.बी. सय्यद डेप्यु. सेक्रेटरी संदीप शिरसाठ फायनान्स मॅनेजर सोमनाथ बोरनारे, चीफ इंजिनिअर निवृत्त गांगुर्डे, चिफ केमिस्ट सुर्यकांत ताकवणे, शेतकी अधिकारी निळकंठ शिंदे, तसेच सर्व विभाग प्रमुख व कर्मचारी यांनी देखील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

## संजीवनी पॉलीटेक्निकने मिळवली राज्यस्तरीय डिपेक्स स्पर्धेत दोन बक्षिसे



**● कोपरगाव । वीरभूमी–**
'सृजन' या स्वायत्त ट्रस्ट मार्फत महाराष्ट्र व गोवा राज्यातील अभियांत्रिकीच्या पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थांमधिल विद्यार्थ्यांसाठी 'डिपेक्स' ही टेक्निकल प्रोजेक्ट स्पर्धा घेण्यात येते. पुणे येथे झालेल्या या स्पर्धेत संजीवनी के.बी.पी. पॉलीटेक्निकने दोन स्वतंत्र वर्गवारीमध्ये बक्षिसे मिळवुन संजीवनी टेक्निकल प्रोजेक्टस्मध्ये आघाडीवर असल्याचे दाखवुन दिले. अशा प्रकारे डिपेक्स या अतिशय महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या स्पर्धेत संजीवनीने डबल धमाका उडवुन दिला, अशी माहिती संजीवनी पॉलीटेक्निकने प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

डिपेक्स ही स्पर्धा एकुण ११ वर्गवरीमध्ये घेतल्या जाते. डिफेन्स अँड सायबर सिक्युरीटी या वर्गवारीत कॉम्प्युटर टेक्नॉलॉजीच्या मैत्रेयी अनिल कुलकर्णी, गौरी सुनिल कोटमे, वैष्णवी किशोर जावळे व समृध्दी अनिल लहारे यांनी 'एआय व्हाईस डिटेक्शन टूल' हा प्रोजेक्ट प्रात्यक्षिकासह सादर करून सुमारे १५० मुलींच्या गटातुन रू ५००० रोख, विजयचिन्ह (ट्रॉफी) व प्रशस्तीपत्रके असे स्पेशल बक्षिस मिळविले.या प्रोजेक्ट मार्फत मानवी आवाज व हुबेहुब तसाच असणारा कृत्रिम आवाज यातिल यातिल फरक स्पष्ट करून मुळ आवाज ओळखला जातो. ते विद्यार्थ्यांनी दाखवुन दिले. त्यांना प्रा.एम. आर. शेख यांनी मार्गदर्शन केले. तसेच याच स्पर्धेमध्ये मेडीकल अँड हेल्थ केअर वर्गवारीमध्ये मेकॅट्रॉनिक्सच्या अच्युत प्रणिल चौधरी, सुदर्शन अनिल चौधरी, वैष्णवी सुधाकर भोसले व कल्याणी संजय घाडगे यांनी 'सहयोग–एमपावरींग लाईव्हज वुईथ रोबोटिक प्रिसिझन अँड केअर' हा प्रोजेक्ट प्रात्यक्षिकासह सादर करून एकुण ५० गटांमधुन दुसरा क्रमांक पटकाविला व रू ५००० रोख रकमेचे बक्षिस, ट्रॉफी आणि प्रशस्तीपत्रके मिळविली. या प्रोजेक्ट मार्फत ज्या लोकांच्या हाताला अपंगत्व आलेले आहे आणि हाताचे कार्य थांबलेले आहे, अशांसाठी रोबोटिकच्या मदतीने कृत्रिम हात तयार करून तो हात कसे कार्य करतो याचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी दाखविले. त्यांना प्रा. अभिजीत गवळी यांनी मार्गदर्शन केले.

संजीवनीचे अध्यक्ष श्री नितीनदादा कोल्हे यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच मॅनेजिंग ट्रस्टी श्री अमित कोल्हे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे, प्राचार्य ए. आर. मिरीकर, विभाग प्रमुख डॉ. जी. एन. जोर्वेकर, प्रा. आय. के. सय्यद, मार्गदर्शक प्रा. षेख व प्रा. गवळी यांचे अभिनंदन केले.

## डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन आणि गुणवंतांचा सत्कार



**● कोपरगाव । वीरभूमी–**
येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक व बस स्थानक, एमएसईबी कार्यालय कोपरगाव येथे भारताचे संविधान निर्माते, विश्वरत्न भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी गुणवंतांचा गौरव देखील करण्यात आला.

या कार्यक्रमात बस स्थानकातील कर्मचारी यांच्या दोन कन्यांनी वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात मोठे यश मिळवले. डॉ. अंकिता कचरू निकम आणि डॉक्टर दिशा बाळासाहेब केकान यांनी एमबीबीएस पदवी उत्तीर्ण केली. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल आगार व्यवस्थापन आणि संजीवनी उद्योग समूहाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे, मा. आ. स्नेहलताताई कोल्हे, युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या वतीने गुणवंतांचा सन्मान करून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या सर्वांना शुभेच्छा देण्यात आल्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संपूर्ण देशाचा अभिमान आहेत. ते विचारवंत, क्रांतिकारक आणि सामाजिक परिवर्तनाचे महान प्रतीक होते. 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा त्यांचा मंत्र आजही प्रत्येक पिढीला नवे बळ देतो. सर्वांना एकोप्याने पुढे घेऊन जाण्याचे काम त्यांनी केले आणि आपल्या देशाला जगातील आदर्श संविधान देण्याचे कार्य त्यांनी केले असे विचार पराग संधान यांनी या प्रसंगी व्यक्त केले.

या कार्यक्रमास अमृत संजीवनीचे चेअरमन पराग संधान, सहकार महर्षी शंकरराव कोल्हे कारखाना संचालक रमेशराव घोडेराव, संचालक विश्वासराव महाले, संचालक बाळासाहेब वक्ते, भाजपा शहराध्यक्ष डी. आर. काले, औद्योगिक वसाहतीचे उपाध्यक्ष केशवराव भवर, मा. गटनेते रवींद्र पाठक, मा.नगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे प्रदीपराव नवले, विजराव आढाव बबलु वाणी, जितेंद्र रणशूर, गोपीनाथ गायकवाड, सत्येन मुंदडा, जनार्दन कदम, नशिरभाई सैय्यद, वैभव गिरमे सद्दामभाई सैय्यद, खालिकभाई कुरेशी अशोक लकारे, आगार व्यवस्थापक अमोल बनकर, स्थानक प्रमुख योगेश दिघे, वहातूक निरीक्षक गिरिश खेमनर वहातूक निरीक्षक अमित हंगे, आगार लेखापाल सुनीता गवळी, वैभव आढाव, राजेंद्र बागुल, रवींद्र रोहमारे आकाश वाजे, विष्णुपंत गायकवाड फकिरमंहमद पहिलवान, दिपक जपे जगदीश मोरे, अकबरभाई शेख, शंकर बिर्हाडे, सुजल चंदनशिव, प्रभुदास पाखरे, चंद्रकांत वाघमारे, सचिन सावंत, मुकुंद उदावंत यांच्यासह अनेक मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वैद्यकीय सेवा समाजक्रांतीचे अविभाज्य साधन

### प्रा. सचिन झगडे । फुले-आंबेडकर जयंती निमित्त 'जीवन गौरव' पुरस्कारांचे वितरण



**● श्रीगोंदा । वीरभूमी–**
धर्म, जात, पंथ सगळे भेद सोडून खऱ्या अर्थाने समाजाची सेवा करण्याचे माध्यम म्हणजे वैद्यकीय सेवा. वैद्यकीय सेवेच्या माध्यमातून समाजाला दुःखातून आणि रोगराईमुक्त करण्याचे समाजकार्य वैद्यकीय क्षेत्रातून केले जात आहे. ज्याप्रमाणे कॅन्सरग्रस्त रुग्णाचा शरीराचा काही भाग ग्रस्त झालेला असतो, त्या प्रमाणे समाजातील चुकीच्या रूढी, चुकीच्या परंपरा, अंधश्रद्धा या कॅन्सर प्रमाणे समाजाला खात असतात त्यांना दुरुस्त करण्याचं काम महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्व महापुरुषांनी केले तोच आदर्श डॉक्टरांनी सेवा करताना जर ठेवला तर आदर्श भारत निर्माण होईल असे प्रतिपादन प्रा. सचिन झगडे यांनी केले.

बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतकरी, कामगार, स्त्रीया, उद्योगधंदे, वीज, पाणी, आर्थिक व्यवस्था या संदर्भातील कार्याचा आढावा घेतला.

अध्यक्षीय मनोगत डॉ. राजेंद्र कदम यांनी केले. वैद्यकीय क्षेत्रातील राष्ट्रीय इम्पा संघटना श्रीगोंदा शाखेच्या वतीने या जयंतीच्या निमित्ताने डॉ. डी. एस. लोणकर (दौंड आरोग्य विभाग), डॉ. उत्तम वडवकर (वैद्यकीय व सामाजिक विभाग), सौ. स्वाती काळे (शिक्षण विभाग), जयराम सोनोने (आरोग्य विभाग), ऋतुपर्ण साळवे (शालेय क्रीडा विभाग), डॉ. भट्टड (दौंड सामाजिक विभाग) या मान्यवरांना जीवनगौरव पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाची भूमिका डॉ. अनिल कोकाटे, प्रास्ताविक डॉ. राजेश पाखरे, सूत्रसंचालन डॉ. प्रमोद गायकवाड यांनी केले. विशेष सहकार्य डॉ. बाळासाहेब पवार आणि संजय टकले यांनी केले.

## महामानवाचे विचार व शिकवणीनुसार प्रत्येकाने वाटचाल करावी : आ. मोनिका राजळे



**● पाथर्डी । वीरभूमी –**
लोकशाही, राष्ट्रीय एकात्मता, सार्वभौमत्व, समता, बंधुभाव, देशातील प्रत्येक नागरिकाला जगण्याचे मुलभूत अधिकार व स्वातंत्र्य आदी या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या संविधानाची वैशिष्टय आहेत. या महामानवाचे कार्य, विचार व शिकवण हा देश कधीही विसरणार नाही. हे विचार, शिकवण हे फक्त जयंती दिना पुरते मर्यादित न ठेवता वर्षभर त्यानुसार वाटचाल करावी. आंबेडकर चळवळीतील कार्यकर्त्यांच्या मागणीनुसार आगामी वर्षभरात या ठिकाणी विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज अभ्यासिका उभी करु यासाठी आमदार निधी किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निधीसाठी पाठपुरावा करु. असे प्रतिपादन आमदार मोनिका राजळे यांनी केले.

भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती पाथर्डी शहरासह तालुक्यात वंचित बहुजन आघाडी, आर.पी.आय. बौद्ध महासभा, सत्यशोधक महासंघ, जयंती उत्सव समिती आदी विविध पक्ष व संघटना यांच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे आमदार मोनिका राजळे, वंचितचे राज्य प्रवक्ते प्रा. किसन चव्हाण, माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड, सतिश गुगळे, प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार डॉ. उद्धव नाईक, मुख्याधिकारी संतोष लांडगे, पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, पोलीस उपनिरीक्षक महादेव गुट्टे, वंचितचे तालुकाध्यक्ष श्रीकांत बोर्डे, आरपीआयचे तालुकाध्यक्ष बाबा राजगुरू, महेश अंगारखे, रविंद्र आरोळे, भाजपचे शहराध्यक्ष बंडु बोरुडे, डॉ. दिपक देशमुख, मुकुंद गर्जे आदींसह विविध मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी आंबेडकर अनुयायांच्या वतीने शहरातून छोटेखानी मिरवणूक काढण्यात आली. प्रा. चव्हाण यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संघर्षमय जीवनपट उपस्थितांसमोर मांडला.

स्व. वसंतराव नाईक चौकात फुलांनी सजवलेल्या भव्य व्यासपीठावर सत्यशोधक महासंघाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा स्थापन करण्यात आला होता. याठिकाणी ज्येष्ठ नेते वसंतराव बोर्डे, राष्ट्रवादीचे नेते प्रताप ढाकणे, तालुकाध्यक्ष शिवशंकर राजळे, बंडु बोरूडे, देवा पवार, शिवसेनेचे नवनाथ चव्हाण, सचिन नागापुरे, माजी नगरसेवक रामनाथ बंग, अरविंद सोनटक्के यांच्यासह विविध मान्यवरांनी महामानवास अभिवादन केले.

गुरु आनंद संगीत मंडळाच्या वतीने शाहीर भारत गाडेकर, गायक बिपिन खंडागळे, सचिन साळवे, संजय राजगुरू यांनी बहारदार भीम गीतांचा कार्यक्रम सादर केला.

यावेळी काकासाहेब शिंदे, लाभन पगारे, नाना पगारे, महेंद्र राजगुरू, जगदीश गाडे, सुरेश भागवत, सुंदर कांबळे, संजय शिरसाठ, किसन काळोखे, अमित काळोखे, सोमनाथ दिनकर, सचिन दळवी, एकनाथ ठोकळ, रोहीणी ठोंबे, आदींसह भिमसैनिक उपस्थित होते. दिवसभर हजारो आंबेडकर अनुयायांनी महामानवास अभिवादन केले. यानिमित्ताने शहरात पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# डॉ. आबेडकरांचा समतेचा मार्ग जगभर स्विकारला जाईल

## ॲड. शिवाजीराव काकडे । शेवगाव येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन



**● शेवगाव । वीरभूमी–**
ज्या –ज्या वेळेस देशात समता नांदली, त्यावेळेस देशाची प्रगती झाली. महापुरुषांना जातीपातीच्या बंधनात अडकवण्याचे काम त्या –त्या समाजातील लोकांनी केले. हा त्यांच्यावरील सर्वात मोठा अन्याय असून तो या देशाला, विश्वाला व मानवतेला मारक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती धर्माच्या भिंती ओलांडून मानवतेच्या कल्याणासाठी कार्य केले. महापुरुष हे सर्व जाती धर्माचे असतात. देशामध्ये समता प्रस्थापित करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अहोरात्र प्रयत्न केले. त्यांनी स्वीकारलेला समतेचा मार्ग हा जगभर स्वीकारला जाईल, असे प्रतिपादन कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष ॲड. शिवाजीराव काकडे यांनी केले.

शेवगाव शहरात जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी ॲड. काकडे बोलत होते.

ॲड. काकडे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे थोर अर्थतज्ञ होते. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच आज भारताची अर्थव्यवस्था प्रगतीपथावर आहे. सवितामाई आंबेडकर यांनी लिहिलेल्या ग्रंथाचे सर्वांनी वाचन करावे. या ग्रंथांचे वाचन केल्यावरच आंबेडकरांच्या जीवनाचा त्याग आपल्याला समजेल. ग्रंथांचे वाचन, चिंतन, मनन केल्यामुळेच आपल्याला डॉ. बाबासाहेबांचे खरे जीवन समजेल.

दरम्यान आबासाहेब काकडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा.अशोक तमनर व ज्ञानेश्वर गरड यांनी डॉ. बाबासाहेबांच्या कार्याची माहिती दिली. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मणराव बिटाळ, शिक्षण विभाग प्रमुख वंदना पुजारी, सहप्रमुख अशोक आहेर, प्राचार्य संपतराव दसपुते, उपप्राचार्या रूपा खेडकर, उपमुख्याध्यापिका पुष्पलता गरुड, पर्यवेक्षक सुनील आव्हाड, हरिश्चंद्र मडके व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिमा उकीर्डे यांनी केले तर प्रकाश गांगर्डे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक बंधू, भगिनी व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व समरसता विभागाच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन



**● पाथर्डी । वीरभूमी–**
महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिवस हा प्रेरणेचा, परिवर्तनाचा आणि आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजेच न्याय, समता आणि बंधुतेचा अनोखा संगम! त्यांच्या विचारांनी लाखो लोकांचे जीवन उजळवले, अन्यायाविरुद्ध लढण्याचं बळ दिलं. भारताच्या संविधानाचे शिल्पकार म्हणून बाबासाहेबांनी केवळ कायदे बनवले नाहीत, तर प्रत्येक वंचित घटकाला आपलं हक्काचं स्थान दिलं. देशात लोकशाही, राष्ट्रीय एकात्मता, सार्वभौमत्व, शिक्षण, समतेचा अधिकार आणि सामाजिक न्याय यासाठी त्यांचा संघर्ष आजही नव्या पिढीला मार्गदर्शक ठरतो, असे प्रतिपादन सामाजिक युवा कार्यकर्ते सिद्धार्थ बोर्डे यांनी व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीच्या निमित्ताने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व समरसता विभागाच्या वतीने आज जयंतीनिमित्त महामानवाला अभिवादन करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी संघाचे मा.तालुका कार्यवाह नानासाहेब पालवे, प्रा. संतोष काळोखे, आदिनाथ लगड, प्रथमेश नाकील, जगदीश लोहिया, निलेश इजारे, गणेश पाथरकर, सतीश दिनकर,विकास दिनकर, कार्तिक कराड, तेजस पटवा, प्रशांत हंपे, सनी दिनकर, सचिन खटावकर, यश दिनकर, अर्जुन दिनकर, देविदास आव्हाड, विठ्ठल होनमुने, शैलेश शिरसाठ, कौतुक चिंतामणी आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रा. संतोष काळोखे यांनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संघर्षमय जीवनपट मांडला त्यांचे विविध पैलू, विविध क्षेत्रात केलेले कार्य, देशभक्ती थोर विचारवंत, जगातील सर्वात महान विद्यार्थी, विद्वान, अर्थतज्ञ शेतीतज्ञ, पर्यावरण, सामाजिक व राजकीय जीवन आदी पैलूंवर प्रकाश टाकला. या महामानवाचा जीवनप्रवास सर्वांनी अभ्यासावा त्यांनी सांगितलेले विचार व शिकवण प्रत्येकांनी अंगिकारावे असे आवाहन केले.

प्रशांत हंपे यांनी स्वागत केले तर महेश बाहेती यांनी आभार मानले.